मूल अक्षरशः स्वतःला घडवत जातं
जन्मापासूनच. आपलं आपणच.
आपण आपला वसा घ्यायचा
त्याला मदत करायचा, त्याच्या गरजेनुसार.

मुलांना शिकता येत प्रौढांकडून
त्यांच्या बोलण्यांतून, वागण्यांतून, चालींतून
त्यांच्या शब्दांतून, शब्दांच्या सुरांतून
मुले अनुभव घेत असतात, आपल्याकडून.

मुलांना शिकता येतं वातावरणातून
वातावरणांतील सुंदरतेतून, शांततेतून
गोंधळ गडबडीतून, शिव्या आणि हिंसेतून
मुले ग्रहनशील असतात घटनांविषयी !

मुलांना घडायचं आहे आपल्यात राहून
त्यांना घडायचय् याच वातावरणातून
आपण आणि भवतालचं हे वातावरण
असेल कसं? फक्त हेच आपण ठरवायचं !

१८.१.२०१९